## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष

## निशाणी क्र.१६

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | - | चंद्रकांत बापु खैरनार, |
| वय | - | ३० वर्षे, |
| व्यवसाय | - | पोलीस कॉस्टेबल ब.नं.५९२ |
| नेमणुक | - | पोलीस ठाणे, पिंपळनेर, ता. साक्री जि. धुळे, |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. बी. एम. भामरे यांचे मार्फत.**

१. घटना दिनांक २७.०३.२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेच्या सुमारास घडली. घटना कामपुर गांव येथे मका फॅक्टरीसमोर रस्त्यावर घडली होती. त्याठिकाणी एक आयशर गाडी क्र. एम.एच.०४/जी.एफ.३७२७ ही पलटी झाली होती. त्या वाहनाचे व त्यातील मालाचे नुकसान झालेले होते. अशी माहीती आम्हांला मिळाल्यानंतर मी व पो.ना. १२३६ चंद्रकांत साहेबराव साळुंके घटनास्थळी गेलो होतो. आम्ही तेथे गेलो असता आम्हांला वर सांगीतल्याप्रमाणे वस्तुस्थीती दिसली. तेथील ड्रायव्हरला नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव योगेश नामदेव कोळी रा. महादेवपुरा, दोंडाईचा असे सांगीतले.

२. आम्ही ड्रायव्हरकडे घटनेबाबत चौकशी केली असता त्याने 'दिनांक २६.०३.२०२१ रोजी त्याने औरंगाबाद येथे गाडीमध्ये पॅप्सीकोला वगैरे माल भरुन येत असतांना दिनांक २७.०३.२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेच्या सुमारास कामपुर जवळ आलो असता समोरील मोटारसायकल स्वाराने अचानक ब्रेक मारला व त्यामुळे मी ही अचानक ब्रेक मारला आणि त्यामुळे गाडी पलटी झाली' अशी हकीकत आम्हांला सांगीतली. सदर घटनेमध्ये मोटारसायकल स्वाराला कोणताही मार लागला नाही. परंतु ड्रायव्हरला स्वतःला किरकोळ मार लागला होता. त्यानंतर पो.ना. १२३६ साळुंके यांनी त्याठिकाणी घटनास्थळ पंचनामा केला. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदवुन घेतले. त्यानंतर तपासाअंती मी घटनेबाबत योगेश नामदेव

कोळी याचे विरुध्द फिर्याद दिली. आता मला प्रस्तुत खटलयातील फिर्याद दाखविण्यात आली. ती मीच दिलेली फिर्याद आहे. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (करीता सदर फिर्यादी नि. १७ देण्यात येते.)

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी. व्ही. पाटील यांचे मार्फत.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताबाबतची सर्व घटना ही माझी ऐकीव माहीती आहे. दिनांक २७.०३.२०२१ ते दिनांक २९.०३.२०२१ या तिन दिवसांच्या कालावधीमध्ये आयशर समोर येणारा मोटारसायकलस्वार कोण होता हे आम्हांला आढळुन आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोंडाईचा ते धुळे हा रस्ता मला चांगल्यारितीने माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, गुल्टन फॅक्टरी ही कामपुर गावापासुन ३०० मी. इतक्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोंडाईचाकडुन धुळेकडे जातांना कामपुर येथील फॅक्टरी ही रस्त्याच्या उजव्या बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कामपुर गांव हे दोंडाईचा ते धुळे या रस्त्यावर उत्तर व दक्षीण अशा दोन्ही बाजुंना आहे. हे म्हणणे खरे आहे की, धुळे नंदुरबार रस्ता हा पुर्व-पश्चीम असा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, कामपुर गावातुन उत्तरेकडुन रस्ता ओलांडुन दक्षीणेकडे जात असतांना च्या ठिकाणी रस्त्यावर पुर्व व पश्चीम अशा दोन्ही बाजुस गतीरोधक आहेत.

४. दिनांक २७.०३.२०२१ रोजी घटनास्थळी भेट दिल्यानंतर दिनांक २८.०३.२०२१ रोजी साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले व त्यामुळे चौकशीअंती दिनांक २९.०३.२०२१ रोजी फिर्याद नोंदविण्यात आली. असे काही घडले नाही की दिनांक २९.०३.२०२१ रोजी मला व पो.ना. साळुंके यांना घटनास्थळ पंचनाम्याकरीता जावे लागले.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासादरम्यान केलेली सर्व कथने ही खोटी

कथन केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केलयाप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नसतांना केवळ आकसापोटी आरोपीने आम्ही सांगीतलेले पोलीस स्टेशनचे काम केले नसल्याने त्याचे विरुध्द खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

दिनांक : १४/०७/२०२३ (आदित्य घ. नाईक)

स्थळ : दोंडाईचा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा